REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 3 | DECEMBER - 2021

# काळाराम मंदिर सत्याग्रहातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका

**Vikas Vilas Shinde**
M.Phil. Student, Department of History , University of Mumbai.

## प्रस्तावना :



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य लोकांना सामाजिक गुलामीतून बाहेर काढण्यासाठी २० जुलै, १९२४ बहिकृत हितकारिणी सभेची स्थापना केली. बहिकृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून नसर्गिक मानवीहक्क मिळवण्यासाठी मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या कार्याला सुरवात केली. त्यामध्ये २० मार्च, १९२७ महाड चा चवदार तळे सत्याग्रह,अमरावतीचा १४ नोव्हेंबर, १९२७ अंबादेवीचा सत्याग्रह,त्याचबरोबर,१३ ऑक्टोंबर, १९२९ पुण्याचा पार्वतीचा सत्याग्रहकेला चवदार तळे, अंबादेवी, पर्वती सत्याग्रहामधून प्रेरणा घेऊन आपला मानवी हक्क मिळावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २ आणि ३ मार्च, १९३० रोजी नाशिकच्या काळाराम मंदिर या ठिकाणी सत्याग्रह करण्यात आला.

## उधिष्टे :

काळाराम मंदिर सत्याग्रहची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडणे.काळाराम मंदिर सत्याग्रहचा आढावा घेणे.काळाराम मंदिर सत्याग्रहमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या भूमिकेची चर्चा करणे. तसेच, काळाराम मंदिर सत्याग्रहच्या परिणामांचा अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक पद्धतीचा वापर करून १९ व्या शतकातील सामाजिक विषमतेचा आढावा घेण्यात आलेला आहे. सुक्ष्म अध्ययन पद्धतीचा वापर करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या स्वलिखित पुस्तकांच्या वाचनातून समान हक्क आणि न्याय या मुल्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच, मनुस्मृती धर्मग्रंथातील सामाजिक विषमता आणि भारतीय संविधान यांचा तुलनात्मक अभ्यास करून भारतीय संविधानात दिलेल्या मुलभूत हाकांच्या अभ्यास करण्यात आला आहे

## ऐतिहासिक पार्श्वभूमी :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजात असणाऱ्या रूढी,परंपरा, उच्च - नीचताभेदभाव, अस्पृश्यता यांना पायबंद घालण्यासाठी आणि सामाजिक सुधारणा करण्यासाठी मानवी हक्काच्या चळवळी केल्या. मानवाला मानवतेची,त्यांच्या हक्काची त्याचप्रमाणे समाजातस्वातंत्र्य,समता, बंधुताआणि स्वाभिमान यांची जाणीव करून देण्याचे महानकार्य डॉ.बाबासाहेबआंबेडकर यांनी मानवी हक्कांच्या चळवळींमधून केले.अस्पृश्य समाजाला त्यांचे मुलभूत अधिकार बहाल करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च, १९२७ रोजी महाडचा सत्याग्रह करूनअस्पृश्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिकाराची जाणीव करून दिली.

मनुस्मृती शासनामध्ये उच्च नीचता, वर्णभेद, स्पृश्य-अस्पृशता जातीयता या सर्व सामाजिक मतभेदांना सामान्य लोकांना सामोरे जावे लागतहोते. म्हणून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर, १९२७ रोजी मनुस्मृती चे दहन केले अस्पृश्य लोकांना मंदिरात प्रवेश करून समान हक्क मिळवून देण्यासाठी १९२९ मध्ये पुण्याचा पर्वती, सत्याग्रहआणि अमरावती अंबादेवी सत्याग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. अश्याप्रकारे, महाडचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन,पर्वती सत्याग्रह आणि अंबादेवी सत्याग्रह यांच्या अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी हक्कांच्या लढाया केल्या.

## काळाराम मंदिर सत्याग्रह

अस्पृश्यांच्या मानवी हक्कांच्या अमरावती, महाड आणि पुणे येथील सत्याग्रहांमुळे अस्पृश्यांमध्ये एक चैतन्याची लाट निर्माण झाली. हळूहळू हा संघर्ष संपूर्ण भारतामधील अस्पृश्यांपर्यंत पोहोचला. मानवी हक्क मिळवण्यासाठी नाशिकच्या श्री काळाराम मंदिरामध्ये प्रवेश करण्याचा तसेच, गरज पडल्यास सत्याग्रह करण्याचा विचार नाशिकच्या अस्पृश्यवर्गाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना सांगितला.[1] ठिकठिकाणी झालेल्या मंदिर प्रवेश सत्याग्रहामुळे नाशिक येथील काळाराम मंदिर जवळ देखील मानवी हक्कांसाठी संघर्षाचे रान पेटले

श्री नाशिक काळाराम मंदिर सत्याग्रह या ठिकाणी मंदिर प्रवेश करण्यासाठी समिती नेमण्यात आली. श्री भाऊराव गायकवाड यांनी मंदिराच्या पंचांना पत्र पाठवून सांगितले की, आम्ही सर्व अस्पृश्यलोक मंदिर प्रवेश करून रामाचे दर्शनघेणार आहोत. जर हिंदू लोकांनी आम्हाला विरोध केला, तर आम्ही सत्याग्रह करू. परंतु, मंदिराच्या पंचांनी पाच महिने प्रतिक्रिया दिली नाही. म्हणून, अस्पृश्यांनी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला.[2]काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने मांडणी करण्यात आली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश करणाऱ्या सत्याग्रहिंवर अत्याचार झाला तर अस्पृश्य त्यांना सळो की पळो केल्याशिवाय राहणार नाही. असे आपले विचार व्यक्त केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्याग्रहात सहभाग घेतला किंवा नाही घेतला तरी त्या सत्याग्रहाचा परिणामां संदर्भात दादासाहेब गायकवाड यांना २० फेब्रुवारी, १९३० ला पत्रपाठवले. काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह करण्याच्या बातमीमुळे श्री काळाराम मंदिराच्या परिसरात सर्व बाजूनी ३०० मीटरच्या अंतरावर शस्त्रे हत्यारे, दगड काठ्या अश्या गोष्टी वापरण्यास सक्त मनाईचा आदेश जिल्हा मॅजिस्ट्रेट मि. आर. जी. गार्डन यांनी जिल्हा पोलीस ॲक्ट कलम ४२ अनुसार काढला. अस्पृश्यआणि हिंदू यांच्यात मोठा संघर्ष होऊ नये यासाठी सरकारच्या मदतीने श्री घोषाल यांनी मंदिराच्या कमिटीशी बोलून कागदपत्राची मागणी केली. परंतु त्यांच्या वकिलांनी घोषाल यांना नकार दर्शवला मंदिर कमिटीचे १ मार्च, १९३० रोजी घोषाल यांना कागदपत्रास नकार दिल्याचे गव्हर्नर साहेबांच्या कानावर घालण्यात आले. नंतर, २ मार्चला काळाराम मंदिर सत्याग्रहाची

तयारीकेली.[3]अस्पृश्य लोकांनी काळाराम मंदिर प्रवेश करू नये यासाठी पोलीस प्रशासनाने आखणी केली होती. तरी देखील लोकांनी मंदिरात प्रवेश करण्याचे ध्येय सोडले नाही.

२ मार्च, १९३० ला नाशिक येथील महारवाडयाच्या मैदानात सत्याग्रह करण्यासाठी अस्पृश्यांनी मोठ्या संखेने गर्दी केली. अस्पृश्यांचे सुप्रसिद्ध बुद्धिवान नेते डॉ भीमराव रामजी आंबेडकर की, जय अश्या घोषणांचा जयघोष करून टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. मुंबईतून आलेल्या मंडळीनां सत्याग्रह कीती महत्वाचा आहे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या मैदानात सांगितले. त्यानंतर, मिलिटरी मध्ये वापरला जाणारा ब्यांड, स्काऊट ची एक तुकडी आणि त्याच्या मागे ५००० महिला असे मिळून साधारण १६००० लोकांचा सहभाग या सत्याग्रहामध्ये होता. पाच वाजता मिरवणूक काढण्यात आली. मंदिराचे सर्व दरवाजे बंद असल्यामुळे मंदिराच्या दक्षिण गोदावरी घाटच्या बाजूला बऱ्याच मंडळीची भाषणे झाली त्यानंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत सभा झालीआणि मागण्या पूर्ण होई पर्यंत सहभाग घेणाऱ्या अश्या लोकांची नावे घेण्यात आली. त्यामध्ये ३५ स्त्रिया आणि १०० पुरुषांचा सहभाग होता. ४ तुकडीत या लोकांची विभागणी करण्यात आली.[4] काळाराम मंदिर सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांचे व्यवस्थित नियोजन करून २ मार्च १९३० रोजी डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत काळाराम मंदिर सत्याग्रह सुरु करण्यात आला.

३ मार्च, १९३० रोजी जिल्हा मॅजिस्ट्रेट (कलेक्टर) यांनी आदेश काढला की, मंदिराच्या जवळ लोकांनी जर शांततेचे पालन केले नाही तर त्यांच्यावरती गुन्हा दाखल करण्यात येईल. कलेक्टर आणि पोलीस प्रशासन अस्पृशाच्या बाजूने नसून ते हिंदूंच्या बाजूने आहेत अशी माहिती श्री दादासाहेब गायकवाड यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पत्र पाठून दिली. त्याचबरोबर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गव्हर्नरला विनंती केली की, नाशिकचे मंदिर खाजगी आहे त्यामुळे सरकारने लोकांना योग्य माहिती द्यावी अशी विनंती केली. परंतु, दादासाहेब गायकवाड यांना कलेक्टर ने पत्र पाठवून सांगितले की, अस्पृश्यांनी त्या ठिकाणी परत सत्याग्रह केले तर हाकलवून देण्यात येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी श्री गायकवाड यांना पत्र पाठवले आणि त्यांना सागितले की, आपला संघर्ष सरकारशी नाही ह्याची काळजी घेण्यात यावी. दादासाहेब गायकवाड यांच्याकडून सर्व माहिती घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गव्हर्नरला ११ एप्रिल, १९३० ला पत्र पाठवून पोलीस प्रशासन हिंदू मानवी हक्कांच्या समतेच्या लढ्याला विरोध करत असल्याचे कळवले त्याचबरोबर, अस्पृश्यांना समानतेच्या हक्कांसाठी मंदिरात प्रवेश दयावा आणि सर्वांसाठी मंदिर खुले करावे असे सांगितले.[5] काळाराम मंदिर सत्याग्रहसाठी चारीही दिशेने लोकांनी खूप तयारी केली. परंतु, कलेक्टर ने शांतता न पाळण्यास गुन्हा करण्याचे आदेश काढले तसेच, सत्याग्रह करणाऱ्यांना हाकलून टाकण्यात येईल असे सांगतले.त्यामुळे, काळाराम मंदिर सत्याग्रह थांबवण्यात आला व पुन्हा त्यासाठी तयारी करण्याचे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ठरवले. तसेच, पोलीस प्रशासन समतेच्या लढ्य विरोधात काम करत असल्याचे पत्र गव्हर्नरला देखील पाठवण्यात आले.

९ एप्रिल, १९३० रोजी,रामाचा रथ ओढण्यात पोलिसांनी अस्पृश्यांना समानतेची संधी द्यावी असे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते. परंतु, अस्पृश्यांनी रथाला स्पर्श करताच स्पृश्य पोलिसांनी अस्पृश्यांवर हल्ला केला. पोलीस प्रशासन आणि जिल्हा कलेक्टर यांनी १४४ मंदिराभावती लागू करून मंदिराजवळ सत्याग्रहास बंदी घातली.[6] काळाराम मंदिर या ठिकाणी ९ एप्रिल, १९३० रोजी दंगलीचे स्वरूप निर्माण झाले. म्हणूनच १४४ चा कायदा लागू करून सत्याग्रहावर बंदी घालण्यात आली. त्यामुळे, काळाराम मंदिर सत्याग्रहाला बंदी आली. तसेच, मानवीहक्कांसाठी सुरुकेलेल्या मंदिर प्रवेश सत्याग्रहाला देखील स्थगिती आली.

## भारतीय सविधांनातील समानतेचा अधिकार

अस्पृश्य समाजाला समानता, समान संधीतसेच, वंश, धर्म, लिंग या सर्व गोष्टींवरून भेदभाव होऊ नये यासाठी मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरु केले होते.या मानवी हक्कांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड सत्याग्रह, पर्वती सत्याग्रह, अंबादेवी सत्याग्रह तसेच, काळाराम मंदिर सत्याग्रह केले. परंतु,काळाराम मंदिर सत्याग्रहाला प्रखर विरोध करून तसेच, १४४ चा कायदा लाऊन मंदिर प्रवेश सत्याग्रह रोखण्यात आला. त्यामुळे, भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध कलमांअंतर्गत सर्व जनतेला समान अधिकार दिला.

"कलम १४ कायद्यापुढे समानता- राज्य,कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही.कलम १५ धर्म,वंश,जात, लिंग किंवा जन्मस्थल या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई.-(1)राज्य, कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थल या अथवा यांपैकी कोणत्याही कारणांवरून भेदभाव करणार नाही. कलम १५ (२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थाल या अथवा यांपैकी कोणत्याही कारणांवरून कोणत्याही नागरिक- कलम १५,२(क) दुकाने, सार्वजनिक उपाहारगृहहॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीची स्थाने यांत प्रवेश करणे; किंवा [7] कलम १६(२) कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान निवास या किंवा यांपैकी कोणत्याही कारणांवरून राज्याच्या नियंत्रणाखाली कोणतेही सेवायोजन किंवा पद यांचाकरिता अपात्र असणार नाही, अथवा त्यांच्याबाबतीत त्याला प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.कलम १६(५) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टींमुळे,एखाद्या धर्मिक किंवा संप्रादायीक संसतेच्या कारभाराशीसंबंधित असलेल्या पदाचा किंवा तिच्या शासक मंडळच्या कोणत्याही सदस्य म्हणजे विशिष्ट धर्माची अनुयायी असणारी किंवा विशिष्ट संप्रदायिची व्यक्ति असली पाहिजे,अशी रिक्त करणाऱ्या कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही.[8] कलम १७ अस्पृशयता नष्ट करणे-"अस्पृशयता" नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरुपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. "अस्पृश्यतेतून" उदभनारी कोणत्याही नि: समर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.[9] अश्याप्रकारे, कलम १४, १५, १५(२), १५ २(क), १६(२), १६(५) व १७ अनुसार धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थाल या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई करण्यात आली असून सर्वांना कायद्याने समानता देलेली आहे. सर्व जाती धर्मातील लोकांना समान स्वतंत्र्य,हक्क व अधिकार संवविधानाने बहाल केले आहेत.

## निष्कर्ष :

डॉ. बाबासाहेब यांचा लढा देवाचे दर्शन घेण्यासाठी नसून समान हक्क मिळवण्यासाठी होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विषमतावादी आणि असमानतेचीपरिस्थिती बदलण्यासाठी मंदिर प्रवेश सत्याग्रह केले. १९ व्या शतकातील काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या माध्यमातून त्यांनी समान अधिकारांसाठी लढाई केली. काही धूर्त लोकांनी समानतेच्या अधिकारासाठी लढत असलेल्या लढाईला कायद्याचे बंधन घालून रोखाण्याचा प्रयत्न केला. परंतु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात कलम १४, १५, १५(२), १५ २(क), १६(२), १६(५) व १७ च्या अंतर्गत लोकांना नैसर्गिक मानवी हक्क दिले आणि सर्वांना समानता दिली.

## संदर्भ सूची


१) **कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, २०२१.**

२) **खैरमोडे चांगदेव भवानराव,*भीमराव रामजी आंबेडकर, खंड* ३, सुगावा प्रकाशन, पुणे, १४ एप्रिल, २०१७.**

३) **डोळस अविनाश,'जनता'** Source Material on Dr. Babasaheb Ambedkar and Movement of Untouchables Vol. 3-1 **प्रकाशन २०२१**

४) **भारतीय संविधान महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनाद्वारे अनुवादीत आणि संचालन, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, २०१४.**

५) **लहुपाचंग सुधाकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राजकारण मयूर पब्लिकेशन अॅण्ड डिस्ट्रीब्युटर सोलापूर,२७ फेब्रुवारी २०२०.**

६) **वाघ संदेश, आंबेडकरी चळवळीचा इतिहास, संदेश पब्लिकेशन, डिसेंबर २०१२,**


---

[1] **चांगदेव भवानराव खैरमोडे,*भीमराव रामजी आंबेडकर, खंड* ३, सुगावा प्रकाशन पुणे १४ एप्रिल, २०१७, पृ.क्र.३०७**

[2] **चांगदेव भवानराव खैरमोडे,*भीमराव रामजी आंबेडकर, खंड* ३, सुगावा प्रकाशन पुणे १४ एप्रिल, २०१७, पृ.क्र.३०८**

[3] **चांगदेव भवानराव खैरमोडे,*भीमराव रामजी आंबेडकर, खंड* ३, सुगावा प्रकाशन पुणे, १४ एप्रिल, २०१७, पृ.क्र.३१०-३११**

[4] **चांगदेव भवानराव खैरमोडे,*भीमराव रामजी आंबेडकर, खंड* ३, सुगावा प्रकाशन पुणे, १४ एप्रिल, २०१७, पृ.क्र.३१२-१५**

[5] **प्रा. अविनाश डोळस, 'जनता'** Source Material on DR Babasaheb Ambedkar and Movement of Untouchables Vol. 3-1 **पृ. क्र. ७४;चांगदेव भवानराव खैरमोडे,*भीमराव रामजी आंबेडकर, खंड* ३, सुगावा प्रकाशन पुणे, १४ एप्रिल, २०१७, पृ.क्र.३१६-३१७**

[6] **चांगदेव भवानराव खैरमोडे,*भीमराव रामजी आंबेडकर, खंड* ३, सुगावा प्रकाशन, पुणे, १४ एप्रिल, २०१७, पृ.क्र.३१७-३१८; धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,पॉप्यूलर प्रकाशन,मुंबई, २०२१, पृ. क्र.१६१–१६२.**

[7] **भारतीय संविधान महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनाद्वारे अनुवादीत आणि संचालन, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, २०१४, पृ. क्र.,६**

[8] **भारतीय संविधान महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनाद्वारे अनुवादीत आणि संचालन, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, २०१४ पृ. क्र.७**

[9] **भारतीय संविधान महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनाद्वारे अनुवादीत आणि संचालन, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, २०१४ पृ. क्र.८**